खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला
फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

SPB
SHRI PISARNATH
BROADBAND
श्री.संतोष अरविंद शेलार - उपनगराध्यक्ष, माथेरान, ८७९३३११०४४
संत गाडगे महाराज रोड, माथेरान रेल्वे स्टेशनच्या मागे
ता.कर्जत जि. रायगड (माथेरान) - ४१०१०२

वर्ष : ०५ | अंक : ३३९, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, सोमवार, दि.२० जुलै २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# आता कापलं तरी भाजपसमोर झुकणार नाही; आदित्य ठाकरेंचा एल्गार

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१९, मुंबई :** नीट पेपरफुटीवरून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यासाठी दिल्लीतील जंतर मंतर इथं उपोषण करत असलेल्या सोनम वांगचुक यांना पोलिसांनी जबरदस्तीने उपोषणस्थळाहून हटवल्यानंतर वांगचुक यांना समर्थन देण्यासाठी आज शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज पार्क इथं आंदोलनाची हाक देण्यात आली होती.

या आंदोलनकर्त्यांना संबोधित करताना शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे युवा नेते आणि आमदार आदित्य ठाकरे यांनी केंद्रातील भाजप सरकारवर घणाघाती टीका करत आधी शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान आणि नंतर थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या राजीनाम्याची आपली मागणी असणार असल्याचं म्हणत एल्गार पुकारला आहे. तसंच मुंबईतील आंदोलनानंतर आता दिल्लीतील आंदोलनकर्त्यांचीही आपण भेट घेणार असल्याची घोषणा त्यांनी केली.

सत्ताधारी भाजपवर हल्लाबोल करत आदित्य ठाकरे म्हणाले की, नीट, टीईटी असे एकामागोमाग एक पेपरलीक होत आहेत. एमपीएससीसाठीही दरवर्षी आंदोलनं करावी लागत आहेत. देशातील जनतेला अशिक्षित ठेवून अंधभक्त बनवण्याचा भाजपचा प्रयत्न आहे. पण आम्ही अंधभक्त होऊ तर या देशाच्या मातीचे होऊ, आम्ही अंधभक्त छत्रपती शिवरायांचे होऊ, आम्ही अंधभक्त शाहू-फुले-आंबेडकरांचे होऊ. ज्यांनी आपल्याला संविधान दिलं त्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आम्ही अंधभक्त होऊ. पण भाजपसमोर वाकणार नाही, झुकणार नाही. कापलं तरी चालेल पण आम्ही भाजपचे गुलाम होणार



नाही, असं म्हणत आदित्य ठाकरे यांनी भाजपविरोधात आगामी काळात आपण आणखी आक्रमकपणे रस्त्यावर उतरणार असल्याचे जाहीर केले.

**आधी मंत्री प्रधान आणि नंतर प्रधानमंत्री यांचा राजीनामा**

सध्या शिक्षण क्षेत्रातील गोंधळावरून देशातील जनतेकडून शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी केली जात असली तरी आगामी काळात थेट पंतप्रधानांचा राजीनामा मागावा लागेल, असंही आदित्य ठाकरे यांनी म्हटलं आहे. आपण सगळे इथं सोनम वांगचुक या आपल्या हिरोसाठी जमलो आहोत. इथं कोणत्याही एका पक्षाचे लोक आलेले नाहीत, तर विविध संघटनांचे लोक आले आहेत. सगळ्या विषयांवर आपलं एकमत कदाचित होणार नाही, पण एका विषयावर आपलं एकमत होऊ शकतं आणि ते म्हणजे देशाच्या भविष्यासाठी आपल्या सगळ्यांना एकत्र यावंच लागेल. देशभरात सगळे युवा रस्त्यावर उतरले आहेत ते शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यासाठी. आज आपण मंत्री प्रधानचा राजीनामा मागतोय, पण उद्या हे उलटं करून प्रधानमंत्रीचाही राजीनामा मागायला आपण मागेपुढे पाहणार नाही, असं ते म्हणाले.

**आदित्य ठाकरे यांच्या भाषणातील ठळक मुद्दे :**

- ज्या लोकांना देश बदलण्यासाठी लोकांनी बहुमत दिलं होतं, तेच लोक आज संविधान बदलण्यासाठी प्रयत्न करत आहेत.
- एकीकडे इस्त्रोचे १०० शास्त्रज्ञ राजीनामा देऊन बाहेर पडत आहेत. या सरकारला इस्त्रो सांभाळता येत नाही, पण सरकारमधील लोक दुसऱ्या पक्षाचे खासदार फोडत आहे. असे सरकार तुम्हाला मान्य आहे का?
- २०१४ पर्यंत आपण 'सबका मालिक एक है' हे साईबाबांच्या बाबतीत ऐकत होतो. पण आता भाजपला विचारलं तर ते म्हणतात सबका मालिक अदानी है.
- महाराष्ट्रातील एक तरुण मुलगा जो अमेरिकेत काम करत होता त्या अभिजीत दिपकेबद्दल आम्हाला अभिमान आहे. जसा सोनम वांगचुक यांच्याबद्दल आम्हाला अभिमान आहे, तसाच अभिजीतबद्दल अभिमान आहे. त्यांना भेटायला मी जाणार आहे. पण आम्ही असं ठरवलं होतं की, आधी आपण महाराष्ट्रात आंदोलन करून दाखवू, नंतर त्यांना दिल्लीत भेटायला जाऊ.

## सोमन वांगचूग यांच्या समर्थनार्थ शिवसेना - युवासेनेचे उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आंदोलन

**अक्षराज : रविंद्र खाडे**

**दि.१९, शहापूर (ठाणे) :** दिल्ली येथील जंतर-मंतरवर सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी छएएढ परीक्षेतील कथित प्रश्नपत्रिका फुटीच्या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी, विद्यार्थ्यांना न्याय आणि पारदर्शक परीक्षा व्यवस्था यासाठी सुरू केलेल्या आंदोलनाला पाठिंबा दर्शवत शिवसेना - युवासेना, शहापूर तालुका (शिवसेना - उद्धव बाळासाहेब ठाकरे) यांच्या वतीने रविवारी शहापूर येथील शिवतीर्थ, पंचायत समिती परिसरात शांततापूर्ण आंदोलन करण्यात आले.




या आंदोलनाला शिवसैनिक, युवासैनिक, महिला आघाडीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांसह विद्यार्थी, पालक, नागरिक आणि पत्रकारांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून विद्यार्थ्यांच्या न्यायाच्या लढ्याला पाठिंबा दर्शविला.

आंदोलनाच्या प्रारंभी गणेश चौधरी यांनी प्रास्ताविक करून आंदोलनाची भूमिका स्पष्ट केली. त्यानंतर तालुका प्रमुख कुलदीप (बाळा) धानके यांनी उपस्थितांना संबोधित करत विद्यार्थ्यांच्या भविष्याशी कोणतीही तडजोड होऊ नये, परीक्षा व्यवस्था पारदर्शक आणि विश्वासार्ह असावी तसेच संबंधित प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी केली. यावेळी काही पालकांनीही आपल्या भावना व्यक्त करत विद्यार्थ्यांच्या भविष्याबाबतची चिंता व्यक्त करत केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी केली.

या आंदोलनास उपजिल्हाप्रमुख शंकर खाडे, महिला जिल्हाप्रमुख रश्मिताई निमसे, तालुका प्रमुख कुलदीप (बाळा) धानके, महिला तालुका संघटिका गुलाबताई भेरे, युवासेना जिल्हा युवाधिकारी स्वानंद शेळवली, तालुका युवाधिकारी महेश दिनकर, जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र विशे, गणेश अवसरे, चिंतामण जाधव, उपतालुका प्रमुख मधुकर वेखंडे, बाळू विशे, महेश मोरे, शरद मोगरे, प्रसिद्धी प्रमुख रविंद्र खाडे, शहर प्रमुख विजय देशमुख यांच्यासह अनेक शिवसैनिक, युवासैनिक, महिला आघाडीच्या कार्यकर्त्या, नागरिक व पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आंदोलनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना न्याय मिळावा, परीक्षा व्यवस्थेवरील जनतेचा विश्वास अबाधित राहावा आणि अशा प्रकारच्या घटनांची निष्पक्ष चौकशी करून भविष्यात त्या टाळण्यासाठी प्रभावी उपाययोजना करण्यात याव्यात, अशी मागणी करण्यात आली.

## विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समिती बरखास्त करा; नव्या समितीची नियुक्ती करा...



श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समिती तात्काळ बरखास्त करावी. नव्या समितीची त्वरित नियुक्ती करावी. शिंदे गटाच्या निष्ठावान शिवसैनिकांना प्रतिनिधित्व द्यावे. मंदिर व्यवस्थापनात पारदर्शकता, कार्यक्षमता आणि जनसहभाग वाढवावा.

**– सचिन अनंत देवमारे, पंढरपूर शहरप्रमुख**

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.१९, पंढरपूर :** पंढरपूर येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समिती तात्काळ बरखास्त करून नव्या समितीची नियुक्ती करण्यात यावी, अशी मागणी शिवसेना (शिंदे गट) पंढरपूर शहरप्रमुख (ओबीसी) सचिन अनंत देवमारे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, मंदिर समिती गेल्या अनेक वर्षांपासून केवळ मुदतवाढीच्या आधारावर कार्यरत असून, नियमित नियुक्त्या न झाल्याने मंदिर व्यवस्थापनातील पारदर्शकता, कार्यक्षमता आणि जनसहभागावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. त्यामुळे भाविकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यात समिती अपयशी ठरत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

तसेच, सध्याच्या समितीतील शिवसेनेच्या नावावरील सदस्य हे उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाशी संबंधित असल्याचा दावा करत, मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवणाऱ्या शिवसैनिकांना प्रतिनिधित्वाची संधी मिळत नसल्याची खंतही निवेदनातून व्यक्त करण्यात आली आहे. म्हणून विद्यमान समिती बरखास्त करून शिवसेनेच्या निष्ठावान, सक्षम आणि कार्यक्षम कार्यकर्त्यांना संधी देत नव्या मंदिर समितीची नियुक्ती करावी, अशी मागणी सचिन देवमारे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे.

## इको सेन्सिटिव्हच्या चौकटीत अडकलेले माथेरानच्या रस्त्यांची दयनीय अवस्था

पर्यावरणाचे संरक्षण महत्त्वाचेच; पण त्याचबरोबर माथेरानमध्ये राहणाऱ्या नागरिकांना आणि येणाऱ्या लाखो पर्यटकांना सुरक्षितपणे चालण्याचा अधिकारही तितकाच महत्त्वाचा आहे. विकास आणि पर्यावरण यांचा समतोल साधणारा निर्णय आता अधिक विलंब न करता घेण्याची वेळ आली आहे.

**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.१९, माथेरान :** माथेरान हे देशातील वैशिष्ट्यपूर्ण वाहनमुक्त पर्यटनस्थळ म्हणून ओळखले जाते. सुमारे ८ चौ. कि.मी. (सुमारे ८०३ हेक्टर) क्षेत्रफळ असलेल्या या डोंगररम्य शहरात आजही अंतर्गत वाहतुकीसाठी पायी चालणे, घोडे आणि हातरिक्षा हीच पारंपरिक साधने आहेत. गेल्या दोन वर्षांत दस्तुरी नाका ते माथेरान रेल्वे स्थानक या मर्यादित मार्गावर ई-रिक्षा सुरू झाली असली, तरी बहुतांश अंतर्गत रस्त्यांवर आजही पायी किंवा घोड्यावरूनच प्रवास करावा लागतो.

माथेरानमधील बहुतेक रस्ते हे पूर्वीपासून लाल माती व दगडांचे आहेत. मात्र प्रत्येक पावसाळ्यात हे रस्ते वाहून जातात, खोल चर तयार होतात आणि नागरिकांसह पर्यटकांना जीव धोक्यात घालून चालावे लागते. दरवर्षी तेच चित्र, तेच हाल आणि तीच आश्वासने; पण कायमस्वरूपी उपाय मात्र होताना दिसत नाही. यामागील सर्वात मोठा अडथळा म्हणजे इको-सेन्सिटिव्ह क्षेत्राचे कठोर नियम. रस्ते दुरुस्त करण्यासाठी लागणारी लाल माती किंवा दगड स्थानिक पातळीवर उपलब्ध असूनही वन विभाग, महसूल विभाग आणि पर्यावरणीय नियमांमुळे त्याचा वापर करण्यास परवानगी मिळत नाही. परिणामी, छोट्या दुरुस्तीच्या कामालाही अनेक विभागांची मंजुरी आवश्यक ठरते आणि कामे महिनोनमहिने रखडतात.

काही ठिकाणी पेव्हर ब्लॉकचे रस्ते करण्यात आले; परंतु अनेक ठिकाणी ब्लॉक उखडले, खचले किंवा विस्कटले आहेत. त्यांच्या दुरुस्तीलाही परवानग्यांचा अडथळा येतो. दुसरीकडे, घोडेव्यवसाय हा माथेरानच्या पर्यटनाचा महत्त्वाचा भाग आहे. अनेक घोडेवाल्यांचे म्हणणे आहे की, काही प्रकारच्या पेव्हर ब्लॉकवर घोडे घसरतात. त्यामुळे रस्त्यांचे नियोजन करताना घोडे, पर्यटक आणि स्थानिक



नागरिक या तिन्ही घटकांचा समतोल राखणे अत्यावश्यक आहे.

आज पॉइंटकडे जाणारे अनेक रस्ते अत्यंत दयनीय अवस्थेत आहेत. पर्यटनस्थळांचा विकास, सौंदर्यीकरण आणि मोठ्या घोषणा सातत्याने होत असल्या, तरी त्या ठिकाणी पोहोचण्यासाठीचे मूलभूत रस्तेच सुरक्षित नसतील, तर विकासाचा उपयोग काय? मंत्री येतात, घोषणा करतात, अधिकारी पाहण्या करतात; पण माथेरानचा विकास अजूनही कायदे, परवानग्या आणि प्रशासकीय कोंडीत अडकलेला आहे.

यावर उपाय म्हणून वन विभाग, महसूल विभाग, नगरपरिषद आणि पर्यावरण मंत्रालय यांनी संयुक्त कृती आराखडा तयार करून नियमित रस्ता दुरुस्तीसाठी स्वतंत्र, सुलभ परवानगी प्रणाली लागू करणे गरजेचे आहे. इको-सेन्सिटिव्ह दर्जा कायम ठेवत पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाने मजबूत, घोडेस्नेही आणि पादचारीसाठी सुरक्षित रस्ते उभारणे ही काळाची गरज आहे.

## घोडपेठ येथे भीषण अपघात ; दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१९, भद्रावती (चंद्रपूर) :** भद्रावती-चंद्रपूर राष्ट्रीय महामार्गावरील घोडपेठ येथे रविवारी (दि. १९ जुलै) दुपारी सुमारे २ वाजताच्या सुमारास झालेल्या भीषण अपघातात दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला. रस्त्यावर पडलेल्या बारीक गिट्टीमुळे (चुरी) दुचाकी घसरल्याने हा दुर्दैवी अपघात घडल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

मृतकाचे नाव अनिल सुधाकर बावणे (रा. शिवाजीनगर, भद्रावती) असे असून, ते आपल्या ॲक्टिवा (क्रमांक एमएच-३४-सीएस-७८७५) यात दुचाकीने भद्रावतीहून चंद्रपूरकडे ड्युटीवर जात होते. घोडपेठ परिसरात महामार्गावर रस्त्यावर पडलेल्या बारीक गिट्टीवरून दुचाकीचा ताबा सुटल्याने वाहन घसरले. त्याचवेळी मागून येत असलेल्या ट्रक (क्रमांक आरजे-१७-सीबी-३५१९) खाली ते आल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला.

या अपघातातील विशेष बाब म्हणजे अनिल बावणे यांनी हेल्मेट परिधान केले होते. मात्र अपघाताची तीव्रता इतकी भीषण होती की हेल्मेटचा पूर्णपणे चेंदामेंदा झाला. हेल्मेट असूनही त्यांचा जीव वाचू शकला नाही, यामुळे अपघाताच्या भीषणतेची कल्पना येते.

घटनेची माहिती मिळताच भद्रावती पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. मृतकला ग्रामीण रुग्णालय भद्रावती येथे २६५ आणण्यात आले. अपघातानंतर काही काळ महामार्गावरील वाहतुकीवर परिणाम झाला होता.

रस्त्यावर पडलेली बारीक गिट्टी हा अपघातास कारणीभूत ठरल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात असून, याबाबत सखोल तपास सुरू आहे. संबंधित ट्रक, चालक तसेच अपघाताच्या सर्व परिस्थितीची चौकशी ठाणेदार योगेश्वर पारधी यांचे मार्गदर्शनात भद्रावती पोलीस करीत असून, पुढील तपास सुरू आहे.




## समाजवादी चळवळीतील शेवटचा तारा निखळला

ज्येष्ठ समाजवादी नेते, पुरोगामी विचारवंत, युवक क्रांती दलाचे संस्थापक, गांधी स्मारक निधीचे अध्यक्ष, माजी आमदार आणि अभ्यासू लेखक डॉ. कुमार सप्तर्षी यांचे १८ जुलै रोजी वयाच्या ८५ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय आणि वैचारिक क्षेत्राची मोठी हानी झाली आहे. समाजवादी विचारांना आयुष्यभर निष्ठेने वाहून घेतलेल्या या लढवय्या व्यक्तिमत्त्वाच्या जाण्याने समाजवादी चळवळीतील एक तेजस्वी पर्व संपल्याची भावना अनेकांच्या मनात आहे.

डॉ.कुमार सप्तर्षी हे केवळ राजकारणी नव्हते; ते प्रभावी वक्ते, सखोल अभ्यासू विचारवंत, निर्भीड लेखक, कुशल संघटक आणि सामाजिक परिवर्तनासाठी आयुष्य वेचलेले कार्यकर्ते होते. समाजातील विषमता, अन्याय, भ्रष्टाचार आणि जातीयतेविरुद्ध त्यांनी सातत्याने आवाज उठवला. लोकशाही, समाजवाद, समता आणि संविधानिक मूल्यांवर त्यांची दृढ श्रद्धा होती. आपल्या लेखणीतून, व्याख्यानांतून आणि चळवळींतून त्यांनी हजारो युवकांना वैचारिक दिशा दिली. त्यांच्या प्रेरणेने अनेक तरुण युवक क्रांती दलात सहभागी झाले. त्यांपैकी अनेकांनी पुढे आमदार, खासदार, मंत्री आणि सामाजिक कार्यकर्ते म्हणून नावलौकिक मिळवला.

२१ ऑगस्ट १९४१ रोजी अहिल्यानगर जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील खेड या छोट्याशा गावात त्यांचा जन्म झाला. प्राथमिक शिक्षण राशीन येथे, तर माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण नगर येथे झाले. विद्यार्थी दशेतच त्यांना वाचनाची गोडी लागली. संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाच्या काळात नगरमध्ये येणाऱ्या नेत्यांची भाषणे ते आवर्जून ऐकत असत. त्या चळवळीतील विचारांचा त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर खोल प्रभाव पडला.

उच्च शिक्षणासाठी त्यांनी पुण्यातील बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश घेतला. १९६४ मध्ये ते महाविद्यालयाचे जनरल सेक्रेटरी (जी.एस.) म्हणून निवडून आले. याच काळात त्यांना अभिनेते आणि समाजवादी कार्यकर्ते निळू फुले यांचा सहवास लाभला. निळू फुले यांनी त्यांना समाजवादी साहित्य वाचण्यास प्रवृत्त केले आणि डॉ. राममनोहर लोहिया यांच्याशी परिचय करून दिला. पुढे लोकनायक जयप्रकाश नारायण यांच्या सहवासाने त्यांच्या विचारांना अधिक व्यापक दिशा मिळाली. त्यांनी जयप्रकाश नारायण यांना गुरुस्थानी मानले. कार्ल मार्क्स, लेनिन, माओ, डेव्हिड थेरो, महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचाही त्यांच्या वैचारिक जडणघडणीवर प्रभाव होता.

१९६७ मध्ये त्यांनी युवक क्रांती दलाची स्थापना केली. या संघटनेने महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर आणि सामाजिक न्यायासाठी अनेक प्रभावी आंदोलने उभारली. पुढे जयप्रकाश नारायण यांच्या सूचनेनुसार त्यांनी जनता पक्षात प्रवेश केला आणि आमदार म्हणूनही कार्य केले. माजी पंतप्रधान चंद्रशेखर यांच्याशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते.

डॉ.सप्तर्षी यांनी साहित्य क्षेत्रातही मोलाची भर घातली. येरवडा विद्यापीठातील दिवस हे त्यांचे आत्मचरित्र विशेष गाजले. व्यक्तिरंग, धर्माबद्दल यांसारखी पुस्तके त्यांनी लिहिली. तसेच सत्याग्रही विचारधारा हे मासिक दीर्घकाळ चालवून समाजप्रबोधनाचे कार्य केले. त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले.

आजच्या काळात वैचारिक राजकारण दुर्मिळ होत असताना डॉ.कुमार सप्तर्षी यांच्यासारखा निस्वार्थी, तत्त्वनिष्ठ आणि संघर्षशील नेता काळाच्या पडद्याआड जाणे ही समाजासाठी मोठी पोकळी आहे. त्यांनी जपलेली लोकशाही, समाजवाद, सामाजिक न्याय आणि मानवतेची मूल्ये नव्या पिढीने आत्मसात करणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

डॉ.कुमार सप्तर्षी यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय आणि वैचारिक विश्वात कधीही न भरून येणारी पोकळी निर्माण झाली आहे. समाजवादी चळवळीतील अखेरचा तेजस्वी तारा निखळल्याची भावना त्यांच्या जाण्याने अधिक तीव्र झाली आहे.

डॉ.कुमार सप्तर्षी यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

**- श्याम ठाणेदार**

# भक्तवत्सल पांडुरंग!

पांडुरंगाचे परमभक्त संत तुकाराम महाराज हे नेहमी पांडुरंगाच्या नामात दंग असायचे. एकदा त्यांच्या घरी त्यांच्या वडिलांचे श्राद्ध होते. श्राद्ध म्हणजे मरण पावलेल्या व्यक्तीची पुण्यतिथी. त्यासाठी दोन ब्राह्मणांना बोलावले होते. त्यांना फळे आणि दक्षिणा द्यायची होती. मगच घरातील सर्वांची जेवणे व्हायची होती. काय सामान आणायचे ते सांगून जिजाईने त्यांना लवकर घरी यायची आठवण करून दिली. तुकाराम घरातून बाहेर पडले. मार्गावरून चालतांनाही त्यांचे पांडुरंगाचे नामस्मरण चालू होते. ते गावाबाहेर पोहोचले, तेव्हा एका शेतात कापणीचे काम चालू असलेले त्यांना दिसले. तुकारामांना पाहून शेतकरी म्हणाला, काम करायला येता का ? काम कराल तर वेतन देईन, दाणेही देईन. तुकाराम शेतात गेले आणि कणसे तोडू लागले.

घरचे काम पार विसरूनच गेले. दुपार होत आली. ब्राह्मणही यायचे झाले होते. काय करायचे जिजाईला सुचत नव्हते. थोड्याच वेळात तुकाराम घरी आले. जिजाईने सांगितलेले सर्व सामान त्यांनी आणले होते. ती झटपट सिद्धतेला लागली. तुकाराम नदीवर गेले आणि आंघोळ करून घरी आले. तोपर्यंत ब्राह्मण आलेच होते. तुकारामांनी त्यांच्या पुढे केळी, पेरू आणि दुधाचे पेले भरून ठेवले अन् ते ग्रहण करण्याची प्रार्थना केली. नंतर तुकारामांनी ब्राह्मणांना दक्षिणा अर्पण करून नमस्कार केला. तुकारामांना आशीर्वाद देऊन ब्राह्मण घरी गेले. त्यानंतर सर्वांची जेवणे झाली. तुकाराम आपल्या बायकोला म्हणाले, जिजा, आता तू जेव. मी देवळात जातो आणि थोडा वेळ पडतो. तुकाराम देवळाकडे निघून गेले. जिजाईने स्वस्थपणे जेवण उरकले. ती बाहेर आली आणि पहाते तर समोरून तुकाराम येत आहेत. तुकाराम फार दमलेले दिसत होते. तिला नवल वाटले. आताच तर तुकाराम घरी आले, ब्राह्मणांना फळे दिली, दक्षिणा दिली, सर्व कामे पूर्ण केली, हे आपण स्वत: पाहिले आणि आता पहाते हे दुसरेच ! ती तशीच देवळात गेली. तेथे कुणीच दिसत नव्हते. जिजाई पुरी भांबावली होती. तिने सारा प्रकार घरी येऊन तुकारामांना सांगितला. त्यांनी क्षणभर डोळे मिटले, हात जोडले आणि पांडुरंगाला प्रार्थना करू लागले. मग त्यांना सारा प्रकार समजला. तुकारामांच्या डोळयांतून अश्रू वाहू लागले. ते मोठ्या आनंदाने तिला म्हणाले, जिजा, तू खरी भाग्यवान ! आज पंढरीरायांनी माझे रूप घेतले. त्यांनीच तू सांगितलेले सामान आणून दिले आणि आजचा कार्यक्रम उत्तमरीतीने



पार पाडला. वाटेत एका शेतकऱ्याने मला कामाला बोलावले. मी तेथे गेलो आणि घरचे काम विसरूनच गेलो. आज देवानेच माझी लाज राखली.

**(संदर्भ : हिंदुजागृती डॉट ऑर्ग)**

अध्यात्मात भावाला खूप महत्व आहे त्यामुळेच भाव तिथे देव असे म्हटले जाते. भक्तवत्सल पांडुरंगाने संत सखूच्या घरी सखू बनून राहून तिच्या पतीची आणि सासू सासऱ्यांची सेवा केली, गोरा कुंभारासाठी त्याच्या बाळाला जिवंत केले, ज्ञानेश्वरांसाठी रेड्यामुखी वेद वदवले, एकनाथांच्या घरी पाणी भरले, जनाबाईसोबत दळण दळले, तुकारामांना सदेह वैकुंठगमन घडवले. आजमितीला लक्षावधी वारकरी आषाढी-कार्तिकी एकादशीच्या निमित्ताने चालत पंढरीला जातात. त्यांच्या पायांना बळ देणारा, प्रतिदिन नवचैतन्य प्रदान करणारा, वारीच्या काळात त्यांचा चरितार्थ चालवणारा, त्यांच्या घरा दाराची काळजी घेणारा पांडुरंग नव्हे तर आणखी कोण असतो ? अनुभूती केवळ संतांना आल्या असे नव्हे आजमितीला दिंडीतील प्रत्येक वारकरी पांडुरंगाच्या अस्तित्वाची, त्याच्या माऊलीसम कृपेची पदोपदी अनुभूती घेत आहे. देवाच्या दिशेने एक पाऊल चालत गेलो तर देव १० पावले आपल्या दिशेने चालत येतो. फक्त आपला त्याच्याप्रती उत्कट भाव हवा. जिथे भाव असतो तिथे व्यवहार नसतो, स्वार्थ नसतो, स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव नसते. पांडुरंगाची कृपा संपादन करायची असेल तर त्याच्याप्रतीचा भाव वाढायला हवा. चला तर, पांडुरंगाच्या प्रतिचा आपला भाव वाढण्यासाठी, त्याची अखंड कृपा संपादन करण्यासाठी त्याच्याच चरणी अनन्यभावाने शरण जाऊया !

**– सौ. मोक्षदा घाणेकर,**
**काळाचौकी, मुंबई**

# पर्यावरणाबाबत गंभीर कधी होणार?

पर्यावरणाचे महत्त्व अजूनही बहुतांश लोकांना माहित नाही. म्हणून बहुतांश लोक पर्यावरणाबाबत म्हणावे तेवढे गंभीर व जागरूक दिसत नाहीत. पर्यावरणाची जीवापाड काळजी घेत नाहीत. ज्यांना मानवी जीवनाशी निगडित पर्यावरणाचे किती महत्त्व आहे? हे कळते ते लोक पर्यावरणाबाबत नेहमी जागरूक, सतर्क व गंभीर राहतात. पर्यावरणाला धोका पोहोचणार नाही याची पुरेपूर काळजी घेतात. पर्यावरण प्रेमी बनून पर्यावरणाला जीवापाड जपतात. पर्यावरणाचे संरक्षण करतात आणि समाज बांधवांना, गावकऱ्यांना व शेतकऱ्यांना पर्यावरणाचे महत्त्व पटवून देतात.

आता पर्यावरण म्हणजे काय? हा प्रश्न प्रत्येकाला पडलाच असेल. तर हवा, पाणी, जमीन, वनस्पती, प्राणी आणि मानव या सर्वांचा समावेश पर्यावरणात होतो. हवा, पाणी, वनस्पती आणि प्राणी यांचा एकमेकांशी खूप जवळचा संबंध आहे. पेट्रोल व डिझेलवर चालणाऱ्या बहुतांश गाड्या, औद्योगिक कारखाने, जीवाश्म इंधनांचे



ज्वलन हे वायू प्रदूषणास कारणीभूत ठरतात. देशात वायू प्रदूषण करणाऱ्या वाहनांचा सुळसुळाट आणि औद्योगिक कारखान्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे लोकांना स्वच्छ व शुद्ध ऑक्सिजन मिळणे कठीण झाले आहे. म्हणून याचा परिणाम थेट मानवी आरोग्यावर होत आहे. आणि मानवी जीवन धोक्यात येत आहे. वायु प्रदूषण ही समस्या देशात खूप मोठ्या प्रमाणात वाढली आहे. वायु प्रदूषण टाळायचे असेल आणि आरोग्य निरोगी ठेवायचे असेल तर आपल्याला पहिल्यांदा पेट्रोल व डिझेलवर चालणाऱ्या सर्व वाहनांवर बंदी घालावी लागेल आणि सीएनजी, इथेनॉल आणि विजेवर चालणाऱ्या वाहनांना प्राधान्य द्यावे लागेल. तसेच औद्योगिक कारखाने प्रदूषण मुक्त कसे चालवता येतील? यावर सुद्धा विचार मंथन व्हावे लागेल.

हल्ली देशात वृक्षतोड मोठ्या प्रमाणात केली जात आहे. मोठमोठी जंगले नष्ट करून लोक त्या ठिकाणी प्लॉटिंग पाडत आहेत. आणि मोठमोठे उद्योग धंदे आणि वसाहती बसवत आहेत. याचा परिणाम थेट मानवी जीवनावर होत आहे. वृक्षतोड केल्यामुळे पाऊस वेळेवर पडत नाही. पडला तरीही नुसते फवारेच नाहीतर पडतच नाही. अशी विदारक परिस्थिती सध्या महाराष्ट्रात उद्भवली आहे. सध्या महाराष्ट्राच्या काही भागात मनाजोगा मुबलक पाऊस पडत आहे तर काही भागात अजून पावसाचा पत्ता नाही. जिकडे झाडे आहेत तिकडे मात्र पाऊस चांगला बरसत आहे. ही आनंदाची बाब आहे परंतु खेदाची बाब अशी की, बहुतांश लोकांना झाडांचे महत्त्व माहीत नसल्यामुळे ते मोठ्या प्रमाणात वृक्षतोड करत आहेत. पावसाचा आणि वृक्षांचा एकमेकांशी असणारा जवळचा संबंध जर लोकांना माहीत असता तर लोकांनी वृक्षतोड कधीच केली नसती. त्यासाठी प्रशासनाने गावोगावी व खेडोपाडी जाऊन वृक्ष लागवड मोहीम राबवावी. वृक्षांचे महत्त्व लोकांना समजावून सांगावे. वृक्षतोड करणाऱ्यास कठोर शासन करायला हवे. एक माणूस एक झाड ही संकल्पना राबवावी. झाडे लावल्याशिवाय पाऊस पडणार नाही हे लक्षात घेऊन प्रत्येकाने किमान एक तरी झाड लावून व त्याचे संगोपन करून पर्यावरणाला अधिक मजबूत करूया. आता सध्या महाराष्ट्रात दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. मृग नक्षत्राला प्रारंभ झाल्यापासून आतापर्यंत महाराष्ट्राच्या काही भागात पाऊस पडलाच नाही. काही शेतकऱ्यांनी शेतात पेरणी केली तर काही शेतकऱ्यांनी अजूनही पेरणी केलीच नाही. पावसाळा हा ऋतू आता संपत येत आहे. तरीसुद्धा मराठवाडा अजूनही कोरडाठाक आहे. याला आपणच जबाबदार आहोत परंतु आपण निसर्गाला दोष देत आहोत. आपण मोठ्या प्रमाणात वृक्षतोड केलीच नसती आणि पर्यावरणाला अबाधित ठेवले असते तर अशी दुष्काळजन्य परिस्थिती आपल्यावर आलीच नसती. आपणच आपल्या पायावर धोंडा पाडून घेतला आहे. आता गरज आहे आपल्याला पर्यावरणाचे महत्त्व जाणून घेण्याची. आणि खूप खूप वृक्ष लागवड करून पावसाला निमंत्रण देण्याची. त्यासाठी आपल्याला पर्यावरणाबाबत गंभीर होणे काळाची गरज आहे. आपण पर्यावरणाबाबत गंभीर नसल्यामुळे आपल्यावर ही परिस्थिती ओढवली आहे. आपण जोपर्यंत पर्यावरणाबाबत गंभीर होणार नाही आणि पर्यावरणाची काळजी घेणार नाही तोपर्यंत आपल्या वाट्याला सुखाचे दिवस येणार नाहीत. जर आपल्याला मनाजोगा मुबलक पाऊस पडावा असे वाटत असेल तर प्रत्येकाने पर्यावरणाचे संतुलन अबाधित ठेवणे काळाची गरज आहे. त्यासाठी प्रत्येकाने पर्यावरणाचे मोल वेळीच जाणून पर्यावरणाला अधिक मजबूत कसे बनवता येईल याचा विचार करणे आवश्यक आहे. त्यासाठी आपल्याला गरज आहे ती पर्यावरणाबाबत गंभीर होण्याची आणि पर्यावरणाला अधिक सुंदर बनवण्याची...

**- बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

### वृक्ष तपासणी

वृक्षांची नियमीत पणे
हवीआरोग्यतपासणी
अनावश्यक फांद्याची
निदान व्हावी कापणी

जावे कधी मुळांपाशी
योग्य तशीचं खुरपणी
दुर्लक्षित हे कशास्तव
काय दोष राहे कुंपणी

खोडपोखरलेयं किती
केली कधीतर पाहणी
माणूसजपतो स्वतांस
असो टाप टीप राहणी

झाडनाही रे किडलेले
कीड मनोवृत्तीस उणी
भले झाले रे मूकझाडे
आक्रोश ऐकला कुणी

अपघात होता कुठला
सुरू होती दुःख गाणी
भांडू लागले आपसांत
ढोरांचीभरली छावणी

पुजा करे सणावाराला
म्हणेवृक्षांचे असेऋणी
स्वतःच कोसळतोवृक्ष
पाहूनि माणूसा दुर्गुणी

**– हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

## श्रीरामाचे नाव घेऊन चाललेला राजकीय तमाशा थांबवा !

अयोध्येतील प्रभू श्रीराम मंदिरातील दानचोरी प्रकरण सध्या राजकीय पातळीवरच अधिक तापलेले दिसतेय. कारसेवकांच्या बलिदानातून आणि त्यागातून, श्रीरामभक्तांच्या मुक्त अर्पणातून उभे राहिलेले भव्य दिव्य राम मंदिर त्यावेळी सर्वांचेच डोळे दिपवून टाकणारे होते. जेव्हा ते उभे राहिले तेव्हाही श्रेयवादाची वाकयुद्धे पाहायला मिळाली. आज जेव्हा दानचोरी प्रकरण उघड झाले तेव्हा श्रेय घेणारे हीच मंडळी इतरांकडे बोटे दाखवू लागले आहेत. प्रभू श्रीरामाला आणि रामसेतूला काल्पनिक ठरवणारे, कित्येक वर्षे प्रभू श्रीरामांच्या प्रतिमेला त्यांच्याच भूमीत एका तंबूत कोंडून ठेवणारे आज श्रीरामाचे नाव घेऊन सरकारशी दोन हात करत आहेत, लोकांच्या भावना मिळवण्यासाठी मंदिरांच्या पायऱ्या झिजवत आहेत, श्रीरामभक्तांवर लाठ्या चालवणारे, गोळीबार करणारे, त्यांच्यावर खोटे गुन्हे दाखल करणारे आज मंदिरातील दानाचा हिशोब मागत आहेत. श्रीराम नामाचे वावडे असणारे आज रामाच्या नावाने आंदोलने करत आहेत. कोणी रघुपति राघव राजारामचा ढोल बडवत आहेत तर कुणी रामरक्षा म्हणण्याचा सराव करत आहेत, कुणी रामरक्षा माझी संपूर्ण पाठ आहे हे लोकांसमोर छातीठोकपणे सांगत आहेत तर कुणी राम रक्षाच्या विरोधात हनुमान चालिसा म्हणत मैदानात उतरले आहेत. राजकारण्यांच्या या वादामध्ये प्रभू श्रीरामांच्या नावाचा हवा तसा वापर केला जात आहे. श्रीराम मंदिरातील दानचोरी प्रकरणाचा कसून तपास चालू आहे. एकेका गुन्हेगाराची नावे पुढे येत आहेत, त्यांच्याकडून वसुलीही केली जात आहे. मंदिर ट्रस्टने कर्मचाऱ्यांवर दाखवलेला अवाजवी विश्वास, सुरक्षा यंत्रणेतील गलथानपणा आता त्यांच्याही लक्षात आला आहे त्यांमुळे यापुढे त्यामध्ये नक्कीच सुधारणा घडून येईल. या प्रकरणातून अन्य सुप्रसिद्ध मंदिरेही सावध झाली असून त्यांनीही आपल्याकडे असे काही घडणार यासाठी आवश्यक ती खबरदारी घ्यायला सुरुवात केली आहे. हिंदू धर्मात कर्माचा सिद्धांत सांगितला जातो. ज्याचे जसे कर्म त्याला त्याचे फळ आज ना उद्या नक्कीच मिळणार आहे. भक्तांनी श्रद्धेने अर्पण केलेल्या दानावर डल्ला मरणाऱ्यांना इथल्या आणि भगवंताच्या अशा दोन्ही न्यायालयांमध्ये शिक्षेला सामोरे जावेच लागणार आहे. हे खऱ्या भक्तांना ज्ञात असल्याने त्यांच्या मनात कोणताच किंतु परंतु नाही, मात्र दानचोरी प्रकरणाचे राजकीय भांडवल करून त्यावर आपली पोळी शेकवू पाहणाऱ्यांनाही सर्वसामान्य जनतेने ओळखायला हवे. देव भावाचा भुकेला आहे. भक्ताने अंतर्मनाने घातलेली सादही देवाला ऐकू येते. राम रक्षा काय किंवा हनुमान चालिसा काय ही घरात देवासमोर दिवा लावून, हात जोडून मन एकाग्र करून साक्षात देव समोर उभा आहे असा भाव ठेवून म्हणायची स्तोत्रे आहेत. चौकात ५०० माणसे गोळा करून पक्षाची बॅनरबाजी करून द्यायच्या घोषणा नाहीत. त्यामुळे रामाच्या नावाने देशभर चाललेला राजकीय तमाशा थांबायला हवा आणि त्यासाठी जनतेनेच पुढाकार घ्यायला हवा !

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क करा. ९६६४५५९७८०**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात बातम्या

# शरद गुणाजी पाटील यांची, १४४ कल्याण ग्रामीण विधानसभा सचिव पदी निवड

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.१९, डोंबिंवली (ठाणे) :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राजसाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार दि. १६.०७.२०२६ रोजी १४३ डोंबिवली व १४४ कल्याण ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या आहेत.




यामध्ये श्री. शरद गुणाजी पाटील यांची १४४ कल्याण ग्रामीण विधानसभा सचिव पदी निवड करण्यात आली आहे. त्यांना मनसे नेते माजी आमदार राजू दादा पाटील यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देऊन शुभेच्छा देण्यात आल्या.

शरद पाटील यांचा पक्षातील प्रवास : शरद गुणाजी पाटील यांनी २००७ साली महाराष्ट्र सैनिक म्हणून पक्षात प्रवेश केला. त्यांनी उपशाखा अध्यक्ष, शाखा अध्यक्ष, विभाग अध्यक्ष अशा विविध जबाबदाऱ्या यशस्वीपणे सांभाळल्या आहेत. पक्षनिष्ठा आणि कट्टर मनसे सैनिक म्हणून त्यांची ओळख आहे. आज त्यांच्या मेहनतीला आणि निष्ठेला यश मिळून त्यांची १४४ कल्याण ग्रामीण विधानसभा सचिव पदी निवड झाली आहे.

मनसे पक्षाचे ध्येय धोरणे आणि राजसाहेबांचा विचार तळागाळापर्यंत पोहोचवून पक्ष वाढीसाठी काम करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपवण्यात आली आहे.

नियुक्तीनंतर शरद पाटील यांनी सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचे आभार मानले व पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासाठी प्रामाणिकपणे काम करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# कल्याण आरटीओमध्ये 'एमएच-०५/जीएन' नवीन मालिका सुरू

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१९, ठाणे :** कल्याण परिसरातील नवीन दुचाकी खरेदी करणाऱ्या आणि आपल्या वाहनाला मनपसंद तसेच व्हीआयपी क्रमांक मिळवू इच्छिणाऱ्या वाहनधारकांसाठी एक अत्यंत महत्त्वाची आणि आनंदाची बातमी आहे. उप प्रादेशिक परिवहन कार्यालय (आरटीओ), कल्याण येथे दुचाकी या संवर्गासाठी अत्यंत लोकप्रिय ठरत असलेली 'एम एच-०५/जीएन' ही नवीन मालिका येत्या २४ जुलै २०२६ रोजी सुरू होत आहे. या नवीन मालिकेतील आपले आवडते आणि आकर्षक क्रमांक मिळवण्यासाठी वाहनधारकांना दिनांक २० जुलै ते २२ जुलै २०२६ या कालावधीत आगाऊ अर्ज करण्याची सुवर्णसंधी उपलब्ध करून देण्यात आली आहे.


या संदर्भात सविस्तर वृत्त असे की, कल्याण उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या हद्दीत नवीन दुचाकी वाहनांची नोंदणी सातत्याने वाढत आहे. तसेच वाहन खरेदी करताना आपल्या आवडीचा किंवा लकी नंबर मिळवण्यासाठी वाहनधारकांमध्ये नेहमीच मोठी चुरस पाहायला मिळते. हीच मागणी लक्षात घेऊन आरटीओ प्रशासनाने 'एमएच-०५/जीएन' ही नवीन मालिका सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. उप प्रादेशिक परिवहन अधिकारी आशुतोष बारकुल यांनी यासंबंधीची अधिकृत माहिती प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली असून, नवीन दुचाकी वाहनांसाठी आकर्षक क्रमांक घेण्यासाठीचे अर्ज विहित नमुन्यात केवळ तीन दिवसांच्या मर्यादित कालावधीत म्हणजेच २० ते २२ जुलै दरम्यान स्वीकारले जातील, असे त्यांनी स्पष्ट केले आहे.

२४ जुलै रोजी ही नवीन मालिका अधिकृतपणे प्रणालीवर कार्यान्वित करण्यात येईल. त्यामुळे ज्या वाहनधारकांना आपल्या नवीन वाहनाची ओळख अधिक खास करायची आहे, त्यांनी कोणत्याही मध्यस्थांच्या विळख्यात न पडता आरटीओ कार्यालयात वेळेत आवश्यक कागदपत्रांसह व शुल्कासह संपर्क साधून या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे. या मर्यादित कालावधीनंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नसल्याने वाहनप्रेमींनी दिलेल्या मुदतीचे काटेकोर पालन करणे आवश्यक आहे.

# पाटण तालुक्यात वरुणराजाची कृपा, दहा दिवसांपासून उघडलेले आभाळ पुन्हा बरसले

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.१९, पाटण :** गेल्या दहा दिवसांपासून पावसाने दडी म ारल्याने चिंतेच्या गर्तेत सापडलेल्या पाटण तालुक्यातील बळीराजाला अखेर दिलासा मिळाला आहे. काल सायंकाळपासून आणि



आज सकाळपासून पाटण तालुक्यासह परिसरात झालेल्या पावसामुळे शेती पिकांना मोठे जीवदान मिळाले असून, मान टाकू लागलेली पिके आता पुन्हा जोमात येणार असल्याने शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

जुलै महिन्यात पेरणी झाल्यानंतर पावसाने चांगली साथ दिली होती. मात्र गेल्या दहा दिवसांपासून पावसाने अचानक उघडीप दिल्याने शेतात उभी असलेली भात, सोयाबीन, भुईमूग आणि भाजीपाला पिके पाण्याअभावी माना टाकू लागली होती. जमिनीला भेगा पडल्या होत्या. त्यामुळे दुबार पेरणीचे संकट उभे राहते की काय, या भीतीने बळीराजा हवालदिल झाला होता.

दरम्यान, पावसाच्या या उघडिपीचा शेतकऱ्यांनी योग्य उपयोग करून घेतला होता. पाऊस नसल्याने शेतात तन वाढले होते, त्यामुळे शेतकऱ्यांनी या दहा दिवसात आंतरम शागतीची म्हणजेच कोळपणीची कामे पूर्ण केली. तण काढून शेत स्वच्छ केले आणि पिकांना खताचा दुसरा डोस देखील देऊन ठेवला होता. फक्त पावसाची प्रतीक्षा होती.

खत टाकून ८ दिवस झाले, पण पाऊसच नव्हता. खताचा उपयोग होईल की नाही, अशी काळजी वाटत होती. पण आता चांगला पाऊस झाल्याने खत जमिनीत मुरले आहे आणि पिके ४-५ दिवसातच हिरवीगार आणि जोमात दिसतील असे समाधान शेतकऱ्यांनी व्यक्त केले. पाटण तालुक्यातील खरीप हंगाम पुन्हा एकदा बहरात येणार असून, यंदा चांगले उत्पन्न हाती येईल, अशी नवी आशा बळीराजाच्या मनात पल्लवित झाली आहे. हवामान खात्याने पुढील दोन-तीन दिवस हलक्या ते मध्यम पावसाचा अंदाज वर्तवला असल्याने ही आशा आणखी बळकट झाली आहे.

**प्रगतशील शेतकरी किसन संकपाळ सुरुल म्हणाले,**

दहा दिवस पाऊस नसल्याने भाताचे पीक पिवळे पडू लागले होते. आम्ही कोळपून खत घालून ठेवले होते. आता हा पाऊस म्हणजे आमच्यासाठी सोनपाऊसच आहे. पिकाला आता कुठे खरा जोर येईल.

# निलेश लंके प्रतिष्ठान व आपला मावळा तर्फे पंढरीच्या वाटेवर सेवेचा महाकुंभ

## परिते येथे १९ ते २३ जुलै दरम्यान अन्नछत्र व आरोग्य सेवा

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१९, पारनेर (अहिल्यानगर) :** आषाढी वारीसाठी पंढरपूरकडे प्रस्थान करणाऱ्या लाखो वारकऱ्यांच्या सेवेसाठी खासदार निलेश लंके यांच्या मार्गदर्शनाखाली यंदाही सोलापूर जिल्ह्यातील परीते येथे भव्य अन्नछत्र व आरोग्य सेवा केंद्र उभारण्यात येणार आहे. नीलेश लंके प्रतिष्ठान आणि 'आपला मावळा' सामाजिक संघटनेच्या संयुक्त विद्यमाने १९ ते २२ जुलै या कालावधीत हा उपक्रम राबविण्यात येणार असून, चार दिवसांत सुमारे ३ ते ४ लाख वारकऱ्यांना त्याचा लाभ मिळणार आहे. यासंदर्भातील माहिती खासदार नीलेश लंके यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यंदा सलग पाचव्या वर्ष हा



सेवाभावी उपक्रम राबविण्यात येत आहे. विठ्ठलभक्तांच्या सेवेला सर्वोच्च प्राधान्य देत अन्नदानाबरोबरच आरोग्य सेवा, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, चहा, नाश्ता आणि इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. वारीच्या मार्गावरून जाणाऱ्या प्रत्येक वारकऱ्याला आवश्यक त्या क्षणी मदत मिळावी, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे लंके यांनी सांगितले.

**नाशिक ते पंढरपूर दिंडी मार्गाचा प्रश्न लोकसभेत मांडणार**

नाशिक - पंढरपूर दिंडी मार्गाच्या उभारणीसाठी आपण सातत्याने पाठपुरावा करत आहोत. वारकरी, भावीक आणि स्थानिक नागरिकांच्या दृष्टीने हा महत्त्वाचा विषय असून २२ जुलैपासून सुरू होणाऱ्या लोकसभेच्या अधिवेशनात हा प्रश्न पुन्हा प्रभावीपणे मांडणार आहोत. दिंडी मार्गाच्या उभारणीसाठी केंद्र सरकारकडून आवश्यक मंजुरी व निधी मिळविण्यासाठी प्रयत्न सुरू राहतील, असे खासदार निलेश लंके यांनी सांगितले.

वारकऱ्यांच्या आरोग्याची विशेष काळजी घेत परीते येथे २५ ते ३० डॉक्टरांचे पथक, प्रशिक्षित आरोग्य कर्मचारी आणि रुग्णवाहिका चारही दिवस कार्यरत राहणार आहेत. प्रवासादरम्यान उद्भवणाऱ्या विविध आरोग्य समस्यांवर तातडीने उपचार केले जाणार असून, कोरोना काळात आरोग्य व्यवस्थापनाचा मिळालेला अनुभव या सेवेत उपयोगी पडणार असल्याचे त्यांनी नमूद केले. या संपूर्ण सेवायज्ञासाठी सुमारे ५०० स्वयंसेवक कार्यरत राहणार आहेत. यंदाच्या वारीतही सेवाभाव, सामाजिक बांधिलकी आणि मानवतेचा संदेश जपत लाखो वारकऱ्यांच्या सेवेसाठी निलेश लंके प्रतिष्ठान आणि आपला मावळा सामाजिक संघटना सज्ज झाली असून सर्व तयारी पूर्ण झाल्याची माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली.

# ढवळपुरी लैंगिक अत्याचार प्रकरणी; यशवंत थोरात महाराज यांचा जामीन अर्ज फेटाळला

## गुन्ह्याचे गांभीर्य, वैद्यकीय पुरावे, पीडितेचे वय विचारात घेत न्यायालयाची भूमिका

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१९, पारनेर (अहिल्यानगर) :** संपूर्ण महाराष्ट्राला हादरवून सोडणाऱ्या ढवळपुरी (ता.पारनेर) येथील अल्पवयीन मुलीच्या लैंगिक अत्याचार प्रकरणातील आरोपी यशवंत थोरात महाराज याला मोठा धक्का बसला आहे. जिल्हा व सत्र न्यायालय (पॉक्सो विशेष न्यायालय), अहिल्यानगर यांनी थोरात याचा जामीन अर्ज फेटाळला आहे.

फिर्यादीनुसार, पीडित मुलगी इयत्ता आठवीत शिकत असतानाच आरोपीने तिच्यावर प्रथम लैंगिक अत्याचार केला. त्यानंतर अनेक वर्षे विविध प्रकारे तिचे लैंगिक शोषण करण्यात आले. तसेच अत्याचार दरम्यान पीडितेला पक्कडीने चटके दिल्याचाही गंभीर आरोप



फिर्यादीत नमूद करण्यात आले आहेत.

या प्रकरणात आरोपीला अटक झाल्यानंतर त्याने ९ जून २०२६ रोजी जिल्हा व सत्र न्यायालय, अहिल्यानगर येथे जामीनासाठी अर्ज दाखल केला होता. या अर्जावर १४ जुलै रोजी जिल्हा व सत्र न्यायाधीश (पॉक्सो विशेष न्यायालय) एम. एच. शेख यांच्या सम ोर युक्तिवाद झाला. सुनावणीदरम्यान आरोपीच्या वकिलांनी अटक प्रक्रिया बेकायदेशीर असल्याचा दावा करत जामीन मंजूर करण्याची मागणी केली. मात्र पीडितेच्या वतीने ॲड. हृषीकेश शिंदे यांनी जोरदार विरोध करत यापूव याच आरोपीवर वावी पोलीस ठाण्यात बाल लैंगिक अत्याचाराचा गुन्हा नोंद असल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. अशा प्रकारच्या गंभीर आरोपांनंतरही आरोपीला कायद्याची भीती उरलेली नसल्याचा मुद्दा त्यांनी उपस्थित केला.यावेळी सरकारी पक्षाच्या वतीने ॲड. एम. पी. केळगंद्रे यांनी दोषारोपपत्रासोबत जोडलेल्या वैद्यकीय अहवालातील पीडितेच्या शरीरावरील जखमा व बर्न इन्ज्युरींची माहिती न्यायालयासमोर मांडली.

**कायदेशीर लढ्यासाठी वकीलांचे सहकार्य**

दोन्ही बाजूंचा युक्तिवाद, प्रकरणाचे गांभीर्य, पिडितेचे वय, उपलब्ध पुरावे तसेच गुन्ह्याचे संवेदनशील स्वरूप लक्षात घेऊन जिल्हा व सत्र न्यायाधीश एम. एच. शेख यांनी आरोपी यशवंत थोरात महाराज यांचा जामीन अर्ज फेटाळून लावला. याप्रकरणात पीडितेला कायदेशीर सहकार्य म्हणून ॲड. ऋषिकेश शिंदे, ॲड.प्राजक्त करंडे, ॲड.प्रविण आदमाने आणि ॲड. विजया कोतकर यांनी काम पाहिले. तपास पोलीस निरीक्षक ज्योती गडकरी व पोलीस उपनिरीक्षक रणजित मागर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# मुंबई आग्रा महामार्गावर अपघात; इनोव्हा कार व कंटेनर ची धडक

## दोघांचा मृत्यू तर पाच जण गंभीर जखमी

**अक्षराज : नंदकुमार बोरसे**

**दि.१९, शिरपूर (धुळे) :** शिरपूर राजस्थानातील अजमेर येथे गेलेले भाविक नाशिककडे आपल्या घरी परतणाऱ्या भाविकांच्या इनोव्हा कारला शिरपूरजवळ भीषण अपघात झाला. भरधाव इनोव्हा कारने महामार्गावरील कंटेनरला मागून जोरदार धडक दिल्याने झालेल्या या अपघातात दोघांचा जागीच मृत्यू झाला, तर पाच जण गंभीर जखमी झाले आहेत.

अपघाताची माहिती मिळताच शिरपूर पोलीस, महामार्ग वाहतूक पोलीस आणि आपत्कालीन यंत्रणा तातडीने घटनास्थळी दाखल झाली. जखमींना तत्काळ बाहेर काढून उपचारासाठी शिरपूर उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले.



नाशिक सिडको भागातील काही जन अजमेर येथे गेले होते. ते इनोव्हा कार क्रमांक एमएच-०५ सीव्ही-१००१ या वाहनातून परतत होते. शिरपूरजवळ महामार्गावर पुढे असलेल्या कंटेनरला कारने मागून जोरदार धडक दिली. यात कारचा पुढील भागाचा पूर्णपणे चुराडा झाला.

या अपघातात दोघांचा मृत्यू झाला असून पाच जण गंभीर जखमी झाले आहेत.

उपचारादरम्यान नवाज सादिक शेख वय २८ यांचा मृत्यू झाला तर उपचारादरम्यान मयत झाला तर म ोईनुद्दीन रफिक शेख वय ३० जागेवरच मयत झाला होता. दोन्ही राहणार शिवाजी चौक नाशिक येथील राहणारा आहे. तर साहिल महेमूद शेख वय २६, मोहसीन महेमूद शेख वय ३२,साबीर मोईन शेख वय १६, अयान अझरुद्दीन शेख वय २२,कैफ शेख वय २२ हे जखमी झाले आहेत. साबीर शेख गंभीर जखमी झाला आहे.

सदर अजमेर येथे जाणारे भाविक हे सर्व नातेवाईक परिवार होता. यातील सर्वच ३० वर्षाच्या आतीलच होते. त्यांची दोन वाहने होती दोन्ही वाहनात जवळपास ते १४ नातेवाईक परिवारातीलच होते. अजमेर येथून येत असतांना अपघातग्रस्त वाहनाचा चालक हा रात्रीपासून वाहन चालवत होता. सदर घटना ही दिनांक १८ रोजी सकाळी नऊ ते साडेनऊ वाजेच्या दरम्यान झालेली आहे.

वाहन चालकाने पुढे असलेल्या कंटेनरला ओव्हरटेक करण्यासाठी हॉर्न दिला होता. कंटेनर चालकाने वाहन साईडला ही केले होते. मात्र अचानक कंटेनर चालकाने त्याच साईडला कंटेनर आणल्यामुळे कार वरील वाहन चालकाचा वाहनावरील ताबा सुटला व कंटेनरला सदर कार धडकली. अपघात ग्रस्त वाहनातील दोन जणांचा जागीच मृत्यू झाला बाकीच्यांना मात्र उपचारानंतर घरी सोडण्यात आले आहे.

# फुलराणी हायड्रोजनवर आधी विकास हवा !

**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.१९, माथेरान :** माथेरानची ऐतिहासिक 'फुलराणी' मिनी ट्रेन लवकरच हायड्रोजन इंधनावर धावण्याची शक्यता निर्माण झाली आहे. भारतीय रेल्वेने देशात हायड्रोजन तंत्रज्ञानाचा वापर सुरू केल्यानंतर वारसा (हेरिटेज) रेल्वेमार्गांवरही हे तंत्रज्ञान वापरण्याचा विचार सुरू असून, त्यामध्ये म ाथेरान हिल रेल्वेचाही समावेश असल्याची माहिती समोर आली आहे.पर्यावरणदृष्ट्याअतिसंवेदनशील असलेल्या माथेरानसाठी हायड्रोजनवर चालणारी रेल्वे प्रदूषणमुक्त आणि पर्यावरणपूरक पर्याय ठरू शकते. हायड्रोजन फ्युएल सेलवर चालणाऱ्या रेल्वेतून कार्बन उत्सर्जन होत नाही आणि केवळ पाण्याची वाफ बाहेर पडत असल्याने या तंत्रज्ञानाकडे हरित वाहतुकीच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल म्हणून पाहिले जात आहे.मात्र, सध्या हा प्रस्ताव प्राथमिक टप्प्यात असून मध्य रेल्वे किंवा रेल्वे मंत्रालयाने माथेरान हिल रेल्वेसाठी अधिकृत मंजुरी, निधी अथवा अंमलबजावणीचे वेळापत्रक जाहीर केलेले नाही. त्यामुळे हायड्रोजन इंजिनाचा निर्णय प्रत्यक्षात कधी येणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.याच पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते नितीन सावंत यांनी काही महत्त्वाचे प्रश्न उपस्थित केले आहेत. त्यांच्या मते, हायड्रोजन इंजिनाचे स्वागत असले तरी माथेरानच्या मूलभूत समस्यांकडे दुर्लक्ष करून केवळ इंजिन बदलून उपयोग होणार नाही.त्यांनी म्हटले आहे की, सुमारे १५० कोटी रुपयांचा खर्च हायड्रोजन तंत्रज्ञानावर करण्यापूर्वी माथेरानसाठी पर्यायी दळणवळणाचा मार्ग, सुरक्षित रस्ते, पायाभूत सुविधा आणि प्रेक्षणीय स्थळांचा पर्यावरणपूरक विकास करणे अधिक गरजेचे आहे.तसेच, गेली अनेक वर्षे मिनी ट्रेनचा वेग ताशी सुमारे ८ किलोमीटर इतकाच मर्यादित आहे. प्रवासाचा कालावधी कमी होणार नसेल, तर एवढा मोठा खर्च कितपत योग्य ठरेल, असा सवालही त्यांनी उपस्थित केला आहे.हायड्रोजन इंजिनासाठी इंधन भरण्याचा प्लांट कुठे उभारला जाणार, देखभाल शेड कुठे असेल, देखभाल खर्च किती असेल आणि भविष्यात याचा आर्थिक भार रेल्वेवर किंवा प्रवाशांवर पडणार का, याबाबत स्पष्ट माहिती देण्याची मागणीही त्यांनी केली आहे.तसेच, २०१६ नंतर रेल्वे सेवेत झालेल्या बदलांचा उल्लेख करत त्यांनी भविष्यात तोट्याचे कारण देत सेवा पुन्हा मर्यादित करण्याचा किंवा खाजगीकरणाचा मार्ग स्वीकारला जाणार नाही ना, अशी शंकाही व्यक्त केली आहे.माथेरानचा ऐतिहासिक वारसा जपायचा असेल, तर केवळ आधुनिक इंजिन नव्हे तर प्रवाशांचा विश्वास जिंकणे अधिक महत्त्वाचे आहे. रेल्वे सेवा नियमित, वेळेवर आणि परवडणाऱ्या दरात उपलब्ध झाली तरच पर्यटकांची संख्या वाढेल, असेही त्यांनी नमूद केले.याशिवाय सरकारने हायड्रोजन प्रकल्पासाठी मोठी गुंतवणूक करावी; मात्र त्याचबरोबर स्थानिक नागरिकांच्या पाणीपुरवठा, आरोग्य सेवा, पर्यटन सुविधा आणि मूलभूत विकासासाठीही निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.२६ जुलै २००५ रोजी झालेल्या प्रलयंकारी पावसानंतर नेरळ - माथेरान रेल्वे सेवेवर मोठा परिणाम झाला. त्यानंतर रेल्वे सेवा पूर्ण क्षमतेने पूर्ववत न करता सुरक्षेच्या कारणास्तव केवळ दोन फ ेऱ्यांपुरतीच मर्यादित ठेवण्यात आली. आजही अनेक नागरिक आणि पर्यटन व्यावसायिकांच्या मते ही सेवा पूर्वीसारखी सुरू झालेली नाही. त्यामुळे हायड्रोजन इंजिनाचा विचार करण्याबरोबरच नेरळ - माथेरान रेल्वेचे भवितव्य नेमके काय, सेवा पूर्ववत कधी होणार आणि पूर्ण क्षमतेने रेल्वे कधी धावणार, या प्रश्नांची उत्तरे रेल्वे प्रशासनाने स्पष्टपणे देण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# सहनशक्तीची परीक्षा घेऊ नका अण्णा हजारेंचं सोनम वांगचुक यांच्या उपोषणावर मोठं विधान

## सरकारला केलं आवाहन !



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१९, अहिल्यानगर :** सोनम वांगचुक यांनी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी उपोषण सुरू करून २१ दिवस झाले आहेत. २१ व्या दिवशी केंद्र सरकारने त्यांना बळजबरीने आंदोलन स्थळावरून उचलून रुग्णालयात दाखल केले, असा आरोप करण्यात येत आहे. शांततेच्या मार्गाने सुरू असलेल्या आंदोलनावर सरकारची दडपशाही चालू असल्याचा आरोप करत आता कॉंक्रोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी उपोषण सुरू केले आहे. दरम्यान आता २० दिवसांपासून मौन बाळगून असलेल्या अण्णा हजारेंनी ही या आंदोलनावर भूमिका मांडली आहे. उगझ कडून जवळपास तीन आठवड्यांपासून दिल्लीच्या जंतरमंतरवर हे आंदोलन चालू असून दिनांक १८ जुलै २०२६ रोजी सोनम वांगचुक यांना बळजबरीने आंदोलन स्थळावरून हटवल्यामुळे त्यावर संतप्त प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत.

अण्णा हजारे यांनी पीटीआय वृत्तसंस्थेशी संवाद साधताना सोनम वांगचुक यांच्या आंदोलनावर भाष्य केले. सरकारने वांगचुक यांच्या सहनशक्तीची परीक्षा घेऊ नये. त्यांच्या मागण्यांवर हो किंवा नाही, असे उत्तर द्यावे. किमान चर्चा करण्यात तरी काय हरकत आहे?, अशी प्रतिक्रिया अण्णा हजारे यांनी दिली आहे.

दिनांक १८ जुलै रोजी सकाळी जंतर-मंतर येथे साध्या वेषात आलेल्या पोलिसांनी आंदोलकांची दिशाभूल करून सोनम वांगचुक यांना उचलून दिल्लीच्या सफदरजंग रुग्णालयात दाखल केले. मात्र रुग्णालयातही आपण अन्नग्रहण किंवा इतर औषधे घेणार नसून उपोषणावर ठाम राहणार असल्याचा संदेश सोनम वांगचुक यांनी आपल्या पत्नीच्या माध्यमातून दिला. अण्णा हजारे माध्यमांना प्रतिक्रिया देताना म्हणाले,सोनम वांगचुक उपोषण करत असताना त्यांना उचलून रुग्णालयात दाखल केले गेले. सलोख्याने प्रश्न सुटत असतात. चर्चेविना प्रश्न सुटणार नाहीत. चर्चा करून प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करायला हवा. सरकारने सामंजस्याने प्रश्न सोडवावेत. बळजबरी केली तर परिस्थिती बिकट होते.

## थोडक्यात बातम्या

### मुंबई शहर व मुंबई उपनगर सिनिअर नेटबॉल संघ निवड चाचणी अंधेरी स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स मध्ये

**अक्षराज : संदिप येवले**

**दि.१९, मुंबई :** अमेचॉर स्पोर्ट्स असोसिएशन ऑफ महाराष्ट्रच्या वतीने दि.२५ ते २७ जुलै २०२६ या कालावधीत अमरावती येथे आयोजित करण्यात येणाऱ्या सिनिअर राज्यस्तरीय पुरुष व महिला नेटबॉल अजिंक्यपद स्पर्धेसाठी मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हा संघाची निवड चाचणी आयोजित करण्यात आली आहे.

मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील पात्र पुरुष व महिला खेळाडूंनी दि.२० जुलै २०२६ (सोमवार) रोजी अंधेरी स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स येथे सकाळी १०.०० ते ११.०० या वेळेत होणाऱ्या निवड चाचणीस उपस्थित राहावे,असे आवाहन करण्यात आले आहे.निवड चाचणीत सहभागी होण्यासाठी डिस्ट्रिक्ट रजिस्ट्रेशन अनिवार्य असून, सर्व खेळाडूंनी आवश्यक कागदपत्रांसह वेळेपूर्वी उपस्थित राहणे आवश्यक आहे.

सदर निवड चाचणी मुंबई शहर जिल्हा सचिव शशिकला मॅडम व मुंबई उपनगर जिल्हा सचिव जगदीश अंचन यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडणार असून,उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी जिल्हा संघात निवड करण्यात येणार आहे.

# एसआयआरच्या कामाचा बीएलओंवर प्रचंड ताण

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१८, पारनेर (अहिल्यानगर) :** विशेष संक्षिप्त पुनरिक्षण (एसआयआर) मोहिमेमुळे पारनेर तालुक्यातील बूथ लेव्हल ऑफिसर (बीएलओ) यांच्यावर कामाचा प्रचंड ताण निर्माण झाला आहे. अपुऱ्या मनुष्यबळात आणि आवश्यक सुविधांच्या अभावात काम करताना त्यांची मोठी दमछाक होत आहे. दैनंदिन शैक्षणिक व प्रशासकीय जबाबदाऱ्या सांभाळत एसआयआरचे काम वेळेत पूर्ण करण्याचे मोठे आव्हान शिक्षकांसमोर उभे राहिले आहे.

एसआयआर अंतर्गत प्रत्येक मतदाराची माहिती पडताळणे, आवश्यक कागदपत्रे गोळा करणे, घरभेटी देणे, स्थलांतरित व अनुपस्थितीत मतदारांचा शोध घेणे, ऑनलाईन माहिती अद्ययावत करणे आणि रोजचा अहवाल सादर करणे अशा अनेक जबाबदाऱ्या बीएलओंवर टाकण्यात आल्या आहेत. मात्र, या कामासाठी पुरेसे मनुष्यबळ, प्रवासभत्ता, तांत्रिक सुविधा किंवा पुरेसा कालावधी उपलब्ध नसल्याची खंत शिक्षकांमधून व्यक्त होत आहे. ग्रामीण भागात अनेक नागरिक कामानिमित्त बाहेरगावी असल्याने वारंवार घरभेटी द्याव्या लागत आहेत. काही ठिकाणी नागरिकांकडे आवश्यक कागदपत्रे उपलब्ध नसल्याने पडताळणी रखडत आहे. इंटरनेटची समस्या, मोबाईल ॲपमधील तांत्रिक अडचणी आणि सतत बदलणाऱ्या सूचनांमुळे बीएलओंचा वेळ व श्रम अधिक खर्ची पडत आहेत. विशेष म्हणजे बहुतांश बीएलओ हे शिक्षक असल्याने शाळेतील अध्यापन आणि एसआयआरचे काम यांचा समतोल राखणे कठीण होत आहे. परिणामी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कामावरही परिणाम होण्याची भीतीही व्यक्त केली जात आहे.

> बीएलओंनी प्रशासनाकडे अतिरिक्त मनुष्यबळ,पुरेसा वेळ, तांत्रिक सहाय्य, वाहतूक सुविधा आणि स्पष्ट नियोजनाची मागणी केली आहे. अन्यथा एसआरआरची गुणवत्ता आणि वेळेत पूर्तता यावर प्रश्नचिन्ह निर्माण होण्याची शक्यता असल्याचे मत तालुक्यातील शिक्षकांमधून व्यक्त केले जात आहे.
>
> ---
>
> बीएलओ यांच्यावर कामाचा प्रचंड ताण असून शाळा सोडून बीएलओचेच काम करावे लागत आहे. यामुळे अध्यापन प्रक्रिया थांबली असून विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान होत आहे. शिक्षकांना या कामातून वगळणे गरजेचे आहे.
>
> **– दत्तात्रय चौरे, बीएलओ, टाकळी ढोकेश्वर**

### एसआयआर सुधारित कार्यक्रम जाहीर

## अंतिम यादी १९ ऑक्टोबरला प्रसिद्ध होणार




**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१९, मुंबई :** भारत निवडणूक आयोगाने राज्यातील मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण (Special Intensive Revision - SIR) कार्यक्रमाचे सुधारित वेळापत्रक जाहीर केले आहे. अलीकडील अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांनी मुदतवाढीची केलेली विनंती मान्य करून आयोगाने हा निर्णय घेतल्याची माहिती मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांनी दिली आहे.

सुधारित कार्यक्रमानुसार, मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांमार्फत गृहभेटीची मोहीम ३० जून ते ८ ऑगस्ट २०२६ या कालावधीत राबविण्यात येणार असून, मतदान केंद्रांचे सुसूत्रीकरण व पुनर्रचना ८ ऑगस्टपर्यंत पूर्ण करण्यात येईल.

त्यानंतर १७ ऑगस्ट २०२६ (सोमवार) रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध केली जाईल. १७ ऑगस्ट ते १६ सप्टेंबर २०२६ या कालावधीत मतदारांकडून दावे व हरकती स्वीकारण्यात येतील. तसेच १७ ऑगस्ट ते १५ सप्टेंबर २०२६ या कालावधीत नोटिसा देणे, सुनावणी घेणे आणि दावे-हरकतींचा निपटारा करण्याची प्रक्रिया पार पडेल.

यानंतर १९ ऑक्टोबर २०२६ (सोमवार) रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. पात्र नागरिकांनी निर्धारित कालावधीत मतदार यादीत नाव समाविष्ट होण्यासाठी गणना प्रपत्र भरून देऊन निवडणूक प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन सह मुख्य निवडणूक अधिकारी मनोहर पारकर यांनी केले आहे.

# तब्बल १३ दुचाकीसह ६ लाख ४० हजाराचा मुद्देमाल जप्त

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१९, वरोरा (चंद्रपूर) :** वरोरा येथील विषूनगर परिसरातून दुचाकी चोरीला गेल्याची तक्राल अमोल दयाकाम भोग (३२) यांनी केली होती. सदर तक्रारीवरुन पोलिसांनी तपास सुरु केला असता वरोरा शहरातून दुचाकी चोरीच्या आणखी घटना उजेडात आल्या. पोलिसांच्या तपासात संशयित तिघांना ताब्यात घेतले असता त्यांनीच दुचाकी चोरी केल्याचे निष्पन्न झाले. यामध्ये १३ दुचाकी चोरीचा छडा लावण्यात पोलिसांना यश आले असून तब्बल ६ लाख ४० हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींमध्ये हेमंत विनोद चौधरी ( ३५), सुरज एकनाथ उमरे, प्रमोद रामकृष्ण हेपट(३५) याचा समावेश आहे.

वरोरा येथील तपास पथक यांनी वरोरा शहरातील ५० कॅमेराचे सीसीटीव्ही फुटेज तसेच नागपूर -चंद्रपूर हायवे रोड वरील ७० कॅमेरे चे सीसीटीव्ही फुटेज चेक करुन मोटर सायकल चोरी करणारा इसम हा कोणत्या भागाला जातो व कुठून येतो याबाबतची माहिती घेतली. व गोपनीय माहितीच्या आधारे गुन्ह्यातील आरोपींना ताब्यात घेऊन विचारपूस केली असता त्यांनी वरोरा शहर येथून चोरी केलेल्या एकूण ११ मोटार सायकल बाबत माहिती दिली. सदर मोटार सायकल आरोपितांनी जिल्हा वर्धा येथे विक्री करीता दिलेल्या होत्या. तसेच आरोपी, (३५) प्रमोद रामकृष्ण हेपट (३५) रा. वरोरा यांनी बनावट आर. सी. तयार करुन आरोपितांना दिलेल्या होत्या. सदर आरोपीकडून बनावट आर. सी. व दोन



मोटार सायकल असा १ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. या कारवाईत पोलिसांनी एकूण १३ मोटार सायकली जप्त केल्या असून त्यांची किंमत अंदाजे ६,४०,००० रुपये इतकी आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक आयुष नोपानी, अप्पर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे, उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष बाकल, प्रभारी अधिकारी ओमप्रकाश सोनटक्के, यांचे मार्गदर्शनात सपोनि शरद भस्मे, पो. स्टॉफ सुखराज यादव, संदिप मुळे, प्रशांत नागोसे, अमोल नवघरे, नितीन रायपुरे, मवोज ठाकरे, विशाल राजूरकर, सौरभ कुलथे, महेश गावतुरे/२६४३, नेमनुक पो. स्टे. वरोरा अशा विशेष पथकाच्या मदतीने केली आहे.

### आ.मुनगंटीवार यांच्या हस्ते आंबेधानोरा येथील नूतन आदर्श शाळा इमारतीचे लोकार्पण

**अक्षराज : अरुण कुत्तरमारे**



**दि.१९, पोंभुर्णा :** पोंभुर्णा तालुक्यातील आंबेधानोरा येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेच्या नूतन आदर्श शाळा इमारतीचे लोकार्पण आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी रस्ते गावांना जोडतात; पण शिक्षण माणसाला ध्येयापर्यंत पोहोचवते, असे प्रतिपादन करत त्यांनी शिक्षण हेच प्रत्येक विद्यार्थ्याच्या उज्ज्वल भविष्याचे सर्वात प्रभावी साधन असल्याचे सांगितले. ही नवी शाळा केवळ विटा-सिमेंटची इमारत नसून ज्ञान, संस्कार, स्वप्ने आणि कर्तृत्व घडविणारे पवित्र ज्ञानमंदिर असल्याचे नमूद करत विद्यार्थ्यांनी गुणवत्तेच्या, जिद्दीच्या आणि मेहनतीच्या बळावर गाव, जिल्हा व देशाचे नाव उज्ज्वल करावे, असे आवाहन आ.मुनगंटीवार यांनी केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यार्थिनींच्या लेझीम पथकाने पारंपरिक पद्धतीने स्वागत केले. त्यानंतर शाळा परिसरात वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. या लोकार्पण कार्यक्रमाला महिला मोर्चा प्रदेश महामंत्री अल्काताई आत्राम, भाजपा तालुका अध्यक्ष (भाजपा) हरीश ढवस, राहुल संतोषवार, पोंभुर्णा नगराध्यक्षा सुलभाताई पिपरे, उपनगराध्यक्ष अजित मंगळगिरीवार,विनोद देशमुख, ज्योतीताई बुरांडे, आंबेधानोरा सरपंच निरंजनाताई मडावी, माजी सरपंच सिताराम मडावी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष रुपेश जुमनाके, गुरुदास पिपरे, गटविकास अधिकारी नमिता बांगर, कार्यकारी अभियंता बांधकाम प्रदीप बाराहाते उपअभियंता (बांधकाम) सुनील मेश्राम,गटशिक्षणाधिकारी धनराज आवारी, जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक तुकडोजी आलाम यासोबत नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आ. मुनगंटीवार म्हणाले, या शाळेत शिक्षण घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याचे जीवन उज्ज्वल व्हावे, त्यांची स्वप्ने साकार व्हावीत आणि त्यांनी आपल्या ज्ञान, संस्कार व कर्तृत्वाच्या बळावर समाजात आदर्श निर्माण करावा. विद्यार्थ्यांनी आपल्या यशातून आई-वडिलांना सर्वात मोठी भेट द्यावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थीदेखील आपल्या गुणवत्तेच्या आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर कोणत्याही कॉन्व्हेंटमधील विद्यार्थ्यांइतकेच नव्हे, तर त्याहून अधिक यशस्वी होऊ शकतात. विद्यार्थ्यांचे यश हे शाळेच्या नावावर नव्हे, तर त्यांच्या कष्ट, जिद्द आणि गुणवत्तेवर अवलंबून असते, असा विश्वास आ.मुनगंटीवार यांनी व्यक्त केला.

# विंचूर नगरीत श्री जगन्नाथ रथयात्रा महोत्सव उत्साहात संपन्न; भक्तांची अलोट गर्दी

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१९, विंचूर (नाशिक) :** आंतरराष्ट्रीय कृष्णभावनामृत संघ (इस्कॉन) येवला आणि हरे कृष्ण भक्तवृंद विंचूर यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, दि.१९ जुलै रोजी विंचूर (ता. निफाड) येथे भव्य 'श्री जगन्नाथ रथयात्रा महोत्सवाचे' अत्यंत भक्तीमय आणि उत्साही वातावरणात आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्याला परिसरातील शेकडो भाविकांनी उपस्थिती लावून भगवान जगन्नाथांचे दर्शन घेतले.

**टाळ-मृदंगाचा गजर आणि महाआरती**

महोत्सवाची सुरुवात दुपारी २:३० वाजता भगवान जगन्नाथांच्या भव्य महाआरतीने झाली. त्यानंतर दुपारी ३:०० वाजता मुख्य रथयात्रेला मोठ्या थाटामाटात प्रारंभ करण्यात आला. 'हरे कृष्ण हरे कृष्ण, कृष्ण कृष्ण हरे हरे...' या महामंत्राचा गजर आणि टाळ-मृदंगाच्या तालावर संपूर्ण विंचूर नगरी दुमदुमून गेली होती.



**प्रमुख मार्गांवरून फिरला दिव्य रथ**

भगवान जगन्नाथ, बलदेव आणि सुभद्रा मैया यांच्या मूर्तींनी सजलेला दिव्य रथ विंचूरमधील प्रमुख मार्गांवरून फिरवण्यात आला. बजरंग गल्ली येथून सुरू झालेली ही रथयात्रा खाडे गल्ली – निलेश गायकवाड वेस – आंबेडकर वेस – तीन पाटी मार्गे जात राम मंदिर येथे विसर्जित झाली. संपूर्ण मार्गभर भाविकांनी रांगोळ्या काढून आणि पुष्पवृष्टी करून रथाचे स्वागत केले, तसेच रथाची दोरी ओढून पुण्य पदरात पाडून घेतले.

**भाविकांसाठी महाप्रसाद !**

रथयात्रा काळात रथावर आरूढ असलेल्या श्री जगन्नाथ भगवंतांचे जे कोणी दर्शन घेतात, त्यांना भौतिक जगात पुन्हा जन्म घ्यावा लागत नाही, या श्रद्धेने हजारो अबालवृद्धांनी या रथयात्रेत सहभाग नोंदवला होता.

रथयात्रेचा समारोप झाल्यानंतर सायंकाळी ७:३० वाजता सर्व उपस्थित भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. राम मंदिर व शनी मंदिर या ठिकाणी हजारो भाविकांनी शिस्तीत महाप्रसादाचा लाभ घेतला. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी इस्कॉन येवला आणि हरे कृष्ण भक्तवृंद विंचूरच्या सर्व सदस्यांनी व ग्रामस्थांनी विशेष परिश्रम घेतले.

# अवैध तलवार बाळगणाऱ्यांना दोघांना अटक

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१९, घुग्घुस (चंद्रपूर) :** घुग्घुस पोलिसांनी अवैधरित्या तलवार बाळगून फिरणाऱ्या दोन युवकांवर कारवाई करत त्यांना अटक केली आहे. याप्रकरणी घुग्घुस पोलीस ठाण्यात शस्त्र अधिनियमाच्या कलम ४ व २५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये दुखणंपाल झूरी कैथल (३५), रा.आमराई वार्ड घुग्घुस, आणि रोशन विनोद बोंगाडे (२०), रा.बाजार वार्ड, घुग्घुस यांचा समावेश आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दिनांक १८ जुलै रोजी पहाटे रात्रगस्तीदरम्यान सकाळी ६.४० वाजताच्या सुमारास मौजा धानोरा फाटा परिसरात दोन इसम स्कुटीवर तलवार घेऊन फिरत असल्याची गोपनीय माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी पंचासह घटनास्थळी धाव घेत दोघांना ताब्यात घेतले. झडतीदरम्यान त्यांच्या ताब्यातून सुमारे ३० इंच लांबीची धारदार तलवार तसेच मोरपंखी रंगाची ज्युपिटर स्कुटी असा एकूण ६१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.